– प्रेस नोट – दि.११/१०/२०२२.

| | अॅन्टी करप्शन ब्युरो सिंधुदुर्ग |
|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. उत्तम गंगाराम कदम, वय-४५ वर्षे तलाठी सजा दाभोळे ता.देवगड |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/-रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ३,०००/-रूपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांनी त्यांचे कुळवहीवाटीच्या जमिनीसंदर्भात मा. तहसीलदार देवगड यांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करून सातबारा देणेकरीता तलाठी सजा दाभोळे दाखल केलेल्या प्रकरणात तलाठी सजा दाभोळे श्री. उत्तम कदम यांनी तक्रारदार यांचेकडे ५,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याबातची लेखी तक्रार दिनांक १०/१०/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सिंधुदुर्ग यांचेकडे केली होती.<br>तक्रारदार यांचे तक्रारीचे अनुषंगाने दिनांक ११/१०/२०२२ रोजी लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता श्री.उत्तम कदम, तलाठी सजा दाभोळे यांनी तक्रारदार यांचेकडे ५,०००/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती ३०००/- रू. स्विकारणेस संमती देवुन सदरची रक्कम दुपारी ३ वाजेपर्यंत घेवून येण्यास सांगितल्याचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत झालेल्या संभाषणावरून आढळून आले<br>त्यावरून दिनांक ११/१०/२०२२ रोजी तलाठी कार्यालय दाभोळे येथे लाचेचा सापळा आजमाविला असता सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक श्री.उत्तम कदम यांनी तक्रारदार यांचेकडून लाच रक्कम रूपये ३,०००/- स्विकारल्याने त्यांना दिनांक ११/१०/२०२२ रोजी १४.४५ वाजता लाच रक्कमेसहीत रंगेहाथ पकडण्यात आलेले आहे.<br>वरील कारवाई श्री.दिपक कांबळे, पोलीस उपअधीक्षक, अेसीबी सिंधुदुर्ग यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी पाटील यांचेकडून करण्यात आलेली आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी–मा. डॉ. पंजावराव उगले सो, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. ठाणे परिक्षेत्र ठाणे.**

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सिंधुदुर्ग यांचेशी संपर्क करावा.**

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सिंधुदुर्ग, कार्यालय कुडाळ
तहसीलदार कार्यालय कुडाळ समोर, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग, ४१६५२०

संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in

ई–मेल :– dyspacbsindhudurga@gmail.com

ऑनलाईन तक्रार :– acbmaharashtra.net

टोल फ्री नंबर :– १०६४

दुरध्वनी क्र. :– ०२३६२–२२२२८९

पोलीस उपअधीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो सिंधुदुर्ग

Scanned with CamScanner